नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३४५ Issue - 345 | वार शुक्रवार दि. ८ मे २०२६ Blow- Friday Date 8 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# बंगालमध्ये शुभेंदू अधिकारी यांच्या स्वीय सहाय्यकाची हत्या

## अतिशय जवळून अधिकारी यांच्या पीएवर गोळ्या झाडण्यात आल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पश्चिम बंगाल : पश्चिम बंगालच्या निवडणुकीचा निकाल ४ मे रोजी जाहीर झाला. निवडणुकीत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा आणि सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचा पराभव झाला. या घटनेला ४८ तास उलटत नाहीत तोच पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार झाला. ममता बॅनर्जींना निवडणुकीत हरवणाऱ्या शुभेंदू अधिकारी यांच्या पीएची हत्या झाली. अतिशय जवळून अधिकारी यांच्या पीएवर गोळ्या झाडण्यात आल्या.

हत्या झालेले शुभेंदू अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ हे आपल्या स्कॉर्पिओ गाडीतून सहकाऱ्यांसोबत जात होते. वाटेत नंबर प्लेट नसलेल्या दुचाकीवरून आलेल्या ३ हल्लेखोरांनी दोहारिया परिसरात त्यांच्या गाडीचा पाठलाग केला. संधी साधून त्यांनी गाडीला वेढा घातला आणि जवळून अनेक गोळ्या झाडल्या. मध्यग्राममधील दोहरिया इथे ही घटना घडली आहे. हल्लेखोरांनी एकूण १२ गोळ्या झाडल्या असून रथ यांच्यावर ४ गोळ्या झाडल्या चंद्रनाथ यांच्या डोक्याला छातीला आणि पोटाला गोळ्या लागल्याची माहिती मिळत आहे. यांच्यासोबत असलेले त्यांचे सहकारी बुद्धदेव बेर गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरु आहेत.



चंद्रनाथ रथ हे शुभेंदू अधिकारी यांचे खासगी सचिव म्हणून काम पाहत होते. भवानीपूर विधानसभा निवडणुकीत एक महत्वाचे सदस्य म्हणू त्यांची नियुक्ती केली गेली होती. शिवाय एक विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख होती. या घटनेनंतर बंगालच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून 'राजकीय हत्येच्या दृष्टीने या घटनेकडे पहिले जात आहे. चंद्रनाथ रथ यांची हत्या ही पूर्वनियोजित होती, त्यांच्या पाठलाग करून त्यांची हत्या केली, या हत्येमागे तृणमूल काँग्रेसचा हात आहे, असा आरोप भाजपचे नेते अर्जुन सिंग यांनी केला आहे.

माझ्या सहाय्यकाच्या हत्येबाबत आम्ही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि आमचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांना माहिती दिली आहे. माझ्या सहाय्यकाव्यतिरिक्त, बसीरहाट येथे आमच्या एका कार्यकर्त्यावर गोळीबार करण्यात आला, तर बारानगर येथे दुसऱ्या एका कार्यकर्त्यावर चाकूने हल्ला करण्यात आला. आम्ही सर्वांना आवाहन करतो की, कोणीही कायदा हातात घेऊ नये. माझ्या सहाय्यकाच्या या निर्घृण हत्येचा पोलीस तपास करतील, असे आश्वासन पोलीस महासंचालकांनी मला दिले आहे.

# नाशिक हादरवणाऱ्या टीसीएस धर्मांतर प्रकरणातील आरोपी निदा खानला अखेर बेड्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : नाशिक येथील बहुचर्चित टीसीएस धर्मांतर प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी निदा खान हिला अखेर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून फरार असलेल्या निदाला छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आली आहे. नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी अत्यंत गोपनीयरीत्या संयुक्त कारवाई करत ही मोठी कामगिरी बजावली.



मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, निदा खान छत्रपती संभाजीनगरमधील नायगाव परिसरात लपून बसली होती. याची खात्री होताच पोलिसांनी परिसरात सापळा रचला आणि संध्याकाळच्या सुमारास तिला ताब्यात घेतले. अटकेनंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून तिला पुढील तपासासाठी नाशिक पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

नाशिकमधील आयटी क्षेत्रातील नामांकित कंपनी असलेल्या 'ढउड' मध्ये काम करणाऱ्या काही तरुणांना टार्गेट करून त्यांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न झाल्याचा खळबळजनक प्रकार काही दिवसांपूर्वी उघडकीस आला होता. या प्रकरणात निदा खानवर तरुणांचे ब्रेनवॉश करणे आणि त्यांना धर्मांतरासाठी प्रवृत्त केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. हे प्रकरण समोर आल्यापासूनच नाशिकसह संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. हिंदुत्ववादी संघटनांनी या प्रकरणी आक्रमक पवित्रा घेत आरोपींच्या अटकेची मागणी केली होती. गुन्हा दाखल झाल्यापासून निदा खान पोलिसांना चकवा देऊन फरार झाली होती. तिच्या अटकेसाठी नाशिक पोलिसांची विविध पथके रवाना करण्यात आली होती. निदा खानच्या अटकेमुळे या धर्मांतर प्रकरणामागे नेमके कोणते रॅकेट सक्रिय आहे का? तसेच तिला कुणाचे पाठबळ मिळत होते? या प्रश्नांची उत्तरे आता तपासातून समोर येण्याची शक्यता आहे. नाशिक पोलीस आता तिची सखोल चौकशी करणार असून, या प्रकरणात आणखी काही जणांची नावे समोर येण्याची चिन्हे आहेत.

# राज्यात अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाची हजेरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा - जिल्ह्यातील पुणे बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावरील शेंद्रे, बोरगाव, नागठाणे, शहरातील उपनगरात पाऊस झाला आहे.. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांसह वाहनधारकांची चांगलीच उडाली तारांबळ उडाली. आज अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांना हवेत गारवा अनुभवायला मिळत आहे.

सिंधुदुर्ग - जिल्ह्यातील वैभववाडी, फोंडा, करुळ सह कणकवली, वैभववाडी तालुक्याच्या भागात अवकाळी पाऊस झाला आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवसासाठी यलो अलर्ट पावसाचा जारी केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सध्या ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वाऱ्याचा वेग आहे.

रायगडच्या दक्षिण भागातही मुसळधार अवकाळी पाऊस झाला. महाड तालुक्यातील बिरवाडी परिसरात मुसळधार पावसाची बरसात सुरु आहे. वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने वांगणे आणि परिसराला झोडपून काढलं आहे.

नांदेडच्या तीर्थक्षेत्र माहूर तालुक्याला आज वादळी वाऱ्यासह गारपिटीने झोडपून काढलं. आजच्या या पावसामुळे उन्हाळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. विशेषतः या भागात उन्हाळी तीळ अन भुईमुंग पीक मोठ्या प्रमाणात घेतल्या जाते, या दोन्ही पिकांसह हळदीला देखील या पावसाचा फटका बसलाय. आजच्या पावसाने माहूर सह शेजारच्या किनवट तालुक्यात दाणादाण उडवली आहे. या अचानक आलेल्या पावसाने अनेक ठिकाणी घरांचे



नुकसान झाले आहे. तर आज अनेक आयोजित लग्नसोहळ्याला या वादळी वाऱ्यासह गारपीटीचा फटका बसला आहे. अचानक आलेल्या पावसाने वऱ्हाडी मंडळींचे मोठे हाल झाले. नांदेड मध्ये अचानक आलेल्या वावटळीमुळे जनजीवनावर मोठा परिणाम झाला. हवेत प्रचंड प्रमाणात धुळीचे कण पसरल्यामुळे शहरात काहीकाळ दृश्यमानता कमी झाली होती. अचानक आलेल्या नागरिकांची धावपळ उडाली तर वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

# कलिंगड नव्हे, तर 'या' कारणामुळे गेला डोकाडिया कुटुंबाचा जीव; मृत्यूचं गूढ अखेर उकललं!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईतील पायधुनी परिसरात डोकाडिया कुटुंबावर ओढवलेल्या दुर्दैवी प्रसंगामुळे संपूर्ण शहर हादरून गेले होते. रात्री कलिंगड खाल्ल्यानंतर दुसऱ्या दिवशी कुटुंबातील चार जणांचा गूढ मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. या घटनेमुळे कलिंगड खाण्याविषयी नागरिकांमध्ये मोठी भीती निर्माण झाली होती, ज्याचा नाहक फटका कलिंगड उत्पादक शेतकरी आणि फळ विक्रेत्यांना बसला. मात्र, आता या प्रकरणाचे खरे कारण समोर आले आहे. कलिना येथील फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीच्या (एफएसएल) अहवालानुसार, या चौघांचा मृत्यू कलिंगडामुळे नव्हे, तर उंदीर मारण्याच्या औषधामुळे झिंक फॉस्फाईड झाला असल्याचे निष्पन्न झाले आहे. कलिंगड आणि मृतांच्या शरीरात या विषाचे अंश आढळून आल्याने तब्बल ११ दिवसांनी पोलीस आणि तपास यंत्रणांना या गुंतागुंतीच्या मृत्यूचे गूढ सोडवण्यात मोठे यश आले आहे. या प्रकरणाचा तपास करणे कलिना एफएसएलसाठी सोपे नव्हते. डॉ. विजय ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञांच्या पथकाने रात्रंदिवस एक करून या प्रकरणाचा अभ्यास केला. विषबाधेतून मृत्यूपूर्वी या चौघांनाही मोठ्या प्रमाणावर उलट्या झाल्या होत्या. विष बहुतांश प्रमाणात उलट्यांवाटे शरीराबाहेर पडल्याने त्यांच्या शरीरातून विषाचे नमुने मिळवणे अत्यंत कठीण झाले होते. तरीही, अत्यंत सूक्ष्म तपासणी आणि अथक परिश्रमांनंतर एफएसएल पथकाला यश आले. मृतांच्या शरीरात आणि घरातील कलिंगडावर 'झिंक फॉस्फाईड' या उंदीर मारण्याच्या औषधाचे अंश स्पष्टपणे सापडले. याव्यतिरिक्त, जे. जे. मार्ग पोलिसांनी घरातून पुलाव, खजूर आणि पाण्याचे नमुनेही तपासासाठी जप्त केले होते. आता या फॉरेन्सिक अहवालाचा सखोल अभ्यास करून आणि वैद्यकीय तज्ज्ञांच्या सल्ल्याने पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# आज लागणार दहावीचा निकाल


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी (८ मे) जाहीर करण्यात येणार आहे. दुपारी एक वाजल्यापासून विद्यार्थ्यांना निकाल ऑनलाइन पाहता येणार आहे. राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी अधिकृत परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणारी दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आली होती. परीक्षेसाठी आठ लाख ६५ हजार ७४० विद्यार्थी, सात लाख ४९ हजार ७३६ विद्यार्थिनी आणि १५ तृतीयपंथी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. राज्यातील एकूण २३ हजार ६८३ शाळांमधून विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून संपूर्ण राज्यातील पाच हजार १११ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात वर्षी दहावीच्या परीक्षेचा निकाल १३ मे रोजी जाहीर करण्यात आला होता. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा दहावीचा निकाल आठ दिवस लवकर जाहीर केला जाणार आहे. गेल्या वर्षी बारावीचा निकाल ९४.१० टक्के लागला होता.

# होर्मुझ सामुद्रधुनीतून ११ भारतीय जहाजे बाहेर, १३ जहाजे परवानगीच्या प्रतीक्षेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : प्रादेशिक तणावाच्या पार्श्वभूमीवर, ११ भारतीय जहाजे हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून यशस्वीरित्या बाहेर पडली आहेत, तर १३ जहाजे अद्याप पर्शियन गल्फमध्ये अडकलेली आहेत. या जहाजांच्या सुरक्षित प्रवासासाठी भारत सरकार इराणच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने चर्चा करत आहे, अशी माहिती गुरुवारी परराष्ट्र मंत्रालयाने दिली.



परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, राजनैतिक चर्चा आणि इराणशी सुरू असलेल्या संवादामुळे ११ भारतीय जहाजे आतापर्यंत हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून बाहेर पडली आहेत. अद्याप १३ जहाजे तिथेच आहेत. ही जहाजे भारतात सुखरूप पोहोचावीत यासाठी आम्ही इराणच्या प्रशासनाच्या संपर्कात आहोत. आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात वावरण्यासाठी इतर देशांच्या जहाजांना परवानगीची गरज नसते, असेही जयस्वाल यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले. इराणने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांसाठी नवीन नियम लागू केल्याच्या पार्श्वभूमीवर ही घडामोड महत्त्वाची आहे. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल'वर पोस्ट करत माहिती दिली की, हॉर्मुझमधील जहाजांच्या वाहतुकीसाठी सुरू असलेली अमेरिकन लष्करी मोहीम तात्पुरती थांबवण्यात आली आहे.

ट्रम्प यांनी म्हटले की, पाकिस्तान आणि इतर देशांच्या विनंतीनुसार, तसेच इराणसोबतच्या करारात होत असलेली प्रगती पाहता आम्ही 'प्रोजेक्ट फ्रीडम' (जहाजांच्या हालचालींसाठीची मोहीम) काही काळासाठी थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. जेणेकरून अंतिम करारावर स्वाक्षरी होऊ शकेल. मात्र, नाकेबंदी पूर्णपणे सुरूच राहील.

समुद्री धोक्याचा स्तर 'गंभीर' : ब्रिटनच्या 'मॅरिटाइम ट्रेड ऑपरेशन्स' या संस्थेने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतील धोक्याचा स्तर 'गंभीर' असल्याचे जाहीर केले आहे. गेल्या ४८ तासांत या भागात अनेक हल्ले झाले आहेत. अहवालानुसार, अमेरिकेच्या नौदलाने काल आणि आज या भागात विविध धोके परतवून लावले आहेत. या क्षेत्रात सुरुंगांचे वृत्त आणि ड्रोन हल्ल्यांचा मोठा धोका असल्याचेही सांगण्यात आले आहे. वाहतुकीत मोठी घट : हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी व्यावसायिक वाहतूक जवळपास ठप्प झाली आहे. ऐतिहासिक सरासरीनुसार दररोज १३८ जहाजे या भागातून प्रवास करतात, मात्र ४ मे रोजी ही संख्या केवळ ५, तर ३ मे रोजी ६ पर्यंत खाली आली आहे. इराणच्या नौदलाने गेल्या ४८ तासांत आक्रमक भूमिका घेतल्याने हे क्षेत्र अत्यंत धोकादायक बनले आहे.

## राज्यपालांच्या भूमिकेमुळे पक्षापुढे अडचण

# तमिळनाडूत बहुमताचा पेच; 'टीव्हीके'ला पाच जागा कमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चेन्नई : तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकलेल्या 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) पक्षाला काँग्रेसने पाठिंबा दिल्यानंतरही बहुमतासाठी पाच जागा कमी पडत आहेत.



त्यातच आधी पाठिंबा देणाऱ्या आमदारांची यादी सादर करा, असा आदेश राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी 'टीव्हीके' प्रमुख विजय यांना दिल्याने तमिळनाडूमध्ये बहुमताचा पेच निर्माण झाला आहे. बहुमताचा आकडा गाठण्यासाठी विजय यांनी डावे; तसेच 'व्हीसीके' या द्रमुकच्या मित्रपक्षांना साद दिली आहे.

आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र घेऊन विजय यांनी बुधवारी राज्यपाल आर्लेकर यांची भेट घेऊन सत्तास्थापनेसाठी बोलावण्याची विनंती त्यांना केली. गुरुवारी ते मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील, असेही म्हटले जात होते. मात्र, राज्यपालांनी सत्तास्थापनेसाठी निमंत्रण न दिल्याने विजय यांनी गुरुवारीही लोकभवन गाठले; तरीही त्यांच्या पदरी निराशाच पडली. त्यांनी आधी ११८ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र आणावे, अशी भूमिका 'लोकभवन'कडून घेण्यात आली. लोकभवनने गुरुवारी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, आर्लेकर यांनी विजय यांच्याशी चेन्नईतील लोकभवनात चर्चा केली. सरकार स्थापनेसाठी तमिळनाडू विधानसभेत आवश्यक असलेले बहुमत अद्याप सिद्ध झालेले नाही, अशी माहिती राज्यपालांनी विजय यांना बैठकीदरम्यान दिल्याचेही पत्रकात म्हटले आहे. त्यामुळे विजय यांच्या सरकार स्थापनेच्या दाव्याबद्दलच अनिश्चितता निर्माण झाली आहे.

विजय यांना सरकार स्थापनेसाठी निमंत्रण न देण्याच्या भूमिकेनंतर राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री व द्रमुक नेते एम. के. स्टॅलिन यांनी सध्या आपण विरोधात बसणार, अशी सावध भूमिका घेतली आहे.

दरम्यान द्रमुक आघाडीतील माकप, भाकपसह विविध पक्षांनी विजय यांच्या नेतृत्वाखालील आघाडीला पाठिंबा द्यायचा की नाही, यावरही चर्चा केली. विजय यांच्या पाठिंब्याच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर डावे पक्ष आणि 'व्हीसीके'च्या नेत्यांनी स्टॅलिन यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

निवडणुकीनंतर सर्वांत मोठ्या पक्षाला सरकार स्थापनेसाठी प्रथम निमंत्रण देणे ही भारतातील स्थापित संसदीय परंपरा मानली जाते. मात्र, सर्वांत मोठ्या पक्षालाच आधी निमंत्रण द्यावे, असा स्पष्ट नियम राज्यघटनेत नाही. बहुमत सिद्ध करू शकणाऱ्या किंवा इच्छिणाऱ्या कोणत्याही पक्षाला किंवा आघाडीला सरकार स्थापनेसाठी बोलावण्याचा अधिकार राज्यपालांकडे असतो. मात्र, अशा निर्णयांवर राजकीय वाद आणि न्यायालयीन प्रश्न उपस्थित होणे सामान्य मानले जाते.

## संपादकीय....

### कायदा-सुव्यवस्थेचे मोठे आव्हान

बुधवारी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील दोहरियाजवळ एक अत्यंत धक्कादायक घटना घडली. अज्ञातांनी भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे निकटवर्तीय आणि स्वीय सहाय्यक चंद्रनाथ रथ यांच्यावर बेछूट गोळीबार केला. या भयंकर हल्ल्यात चंद्रनाथ रथ यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा चालक गंभीर जखमी झाला आहे. कोलकता विमानतळापासून अवघ्या काही अंतरावर घडलेली ही घटना केवळ एक राजकीय हत्या नसून, गुन्हेगारांचे धाडस किती वाढले आहे, याचे हे एक जिवंत आणि क्रूर उदाहरण आहे. राज्याच्या राजधानीतच असा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे. २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपने नुकताच ऐतिहासिक विजय मिळवला आहे. या विजयाचा जल्लोष शांत होण्यापूर्वीच घडलेली ही हत्या, शपथ न घेतलेल्या नव्या सरकारसाठी एक थेट आणि रक्तरंजित इशारा मानली जात आहे. पुढील पाच वर्षांसाठी या नव्या प्रशासनाचे यश-अपयश आता एकाच निकषावर ठरवले जाईल, आणि तो निकष म्हणजे 'राज्यातील बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्था पुन्हा रुळावर आणणे'. दरम्यान, या घटनेचे गांभीर्य ओळखून पश्चिम बंगाल सीआयडीच्या पथकाने मध्यग्रामजवळील घटनास्थळाला भेट देऊन सखोल तपासाला सुरुवात केली आहे. तृणमूल काँग्रेसच्या दशकभराच्या सत्तेनंतर, आता नव्या सरकारला असा पोलीस विभाग वारशाने मिळाला आहे, जो राजकीयदृष्ट्या अत्यंत दुभंगलेला आहे. सध्या नव्या सरकारसमोरील सर्वात मोठे आणि तात्काळ आव्हान हे 'निवडणुकीनंतरचा हिंसाचार' थांबवणे हे आहे. बंगालच्या राजकारणाचा हा इतिहास राहिला आहे की, जेव्हा-जेव्हा सत्तांतर होते, तेव्हा तिथे सूडाचे राजकारण उफाळून येते. निवडणूक आयोगाने हल्ले, तोडफोड आणि कुटुंबांचे विस्थापन यावर 'शून्य सहनशीलता' बाळगण्याचे कडक आदेश दिले आहेत. त्यामुळे पोलिसांना आता अभूतपूर्व निःपक्षपातीपणे काम करावे लागेल. यात सर्वात मोठी कसोटी ही आहे की, हिंसाचार करणाऱ्यांमध्ये जर स्वतःच्याच पक्षाचे (विजेत्या) समर्थक असतील, तरीही पोलिसांना कारवाई करावी लागेल, जेणेकरून अशांततेचे हे दुष्टचक्र कायमचे थांबेल.

## सरकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या 'हिंदी' परीक्षेला स्थगिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य शासनाच्या राजपत्रित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हिंदी भाषेची परीक्षा देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला होता. परंतु, यावरून पुन्हा एकदा मराठी विरुद्ध हिंदी असा वाद सुरु झाल्याने अखेर या निर्णयाला स्थगिती देण्यात आली. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी याबाबतची घोषणा केली.

राज्य शासनाच्या भाषा संचालनालयाने राजपत्रित आणि अराजपत्रित अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषेची परीक्षा घेण्याची घोषणा केली होती. दि. २८ जून रोजी मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये ही परीक्षा होणार होती. परंतु, मनसे आणि इतर संघटनांनी या निर्णयाला विरोध केला होता. मराठी भाषा अभ्यास केंद्राच्या डॉ. दीपक पवार यांनीही यास विरोध केला होता. त्यानंतर हा निर्णय मागे घेण्यात आला.

याबबात बोलताना मंत्री उदय सामंत म्हणाले की, ''सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठीची हिंदी भाषेची परीक्षा रद्द करण्यात आली आहे. या निर्णयाबाबत मी विभागाच्या प्रधान सचिवांशी चर्चा केली असून या परीक्षेला स्थगिती देण्यात आली आहे. भविष्यात हिंदीची परीक्षा आवश्यक आहे का, हे पडताळून बघणार आहे. आवश्यकता नसल्यास हिंदीची परीक्षा न घेण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत. १९७६ च्या नियमावलीनुसार दरवर्षी ही परीक्षा घेतली जाते. आता या परीक्षेची आवश्यकता आहे की, नाही हे पडताळून त्याबाबतचा निर्णय घेऊ.''

# मानवतेची अखंड ज्योत : जागतिक रेड क्रॉस दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मानवजातीच्या इतिहासात युद्धे, नैसर्गिक आपत्ती, रोगराई, दुष्काळ आणि विविध संकटांनी नेहमीच माणसाच्या अस्तित्वासमोर मोठे प्रश्न उभे केले आहेत. अशा संकटांच्या काळात मानवतेच्या रक्षणासाठी काही संस्था आणि व्यक्ती देवदूतासारख्या धावून येतात. जगभरात दुःख, वेदना आणि संकटात सापडलेल्या लोकांना आधार देणाऱ्या अशाच महान चळवळीचे नाव म्हणजे रेड क्रॉस होय. दरवर्षी ८ मे हा दिवस 'जागतिक रेड क्रॉस दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानवतेची सेवा, सहानुभूती, करुणा आणि निःस्वार्थ वृत्ती यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. रेड क्रॉस चळवळीचे संस्थापक हेन्री ड्युनाँ यांच्या जन्म दिनानिमित्त हा दिवस जगभर साजरा केला जातो. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक, सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मानवतेच्या सेवेसाठी समर्पित असलेल्या रेड क्रॉस चळवळीचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. १८५९ साली इटलीतील सोल्फेरिनो येथे फ्रान्स आणि ऑस्ट्रिया यांच्यात भीषण युद्ध झाले. या युद्धात हजारो सैनिक जखमी झाले होते. युद्धभूमीवर जखमी सैनिक वेदनेने तडफडत होते, परंतु त्यांच्यासाठी पुरेशी वैद्यकीय मदत उपलब्ध नव्हती. त्या वेळी स्वित्झर्लंडचे व्यापारी आणि समाजसेवक हेन्री ड्युनाँ तेथे उपस्थित होते. त्यांनी ही भीषण परिस्थिती पाहिली आणि त्यांचे मन व्यथित झाले. त्यांनी स्थानिक लोकांना एकत्र करून जखमी सैनिकांना मदत करण्यास सुरुवात केली. 'टुट्टी फ्रेटेली' म्हणजे 'आपण सर्व भाऊ आहोत' हा संदेश देत त्यांनी मानवतेची एक नवीन दिशा जगासमोर ठेवली.

या अनुभवातून प्रेरित होऊन हेन्री ड्युनाँ यांनी 'अ मेमरी ऑफ सोल्फेरिनो' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये त्यांनी युद्धातील अमानुष परिस्थितीचे वर्णन केले आणि युद्धग्रस्तांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी मदतसंस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. त्यांच्या या विचारांना जगभरातून प्रतिसाद मिळाला आणि १८६३ साली आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस समितीची स्थापना झाली. पुढे १८६४ मध्ये जिनिव्हा करार झाला आणि युद्धातील जखमी सैनिकांच्या संरक्षणासाठी काही आंतरराष्ट्रीय नियम निश्चित करण्यात आले. याच क्षणापासून रेड क्रॉस चळवळीचा जागतिक प्रवास सुरू झाला.




रेड क्रॉस चळवळीची सात मूलभूत तत्त्वे ही तिच्या कार्याची खरी ओळख आहेत. मानवता, निष्पक्षता, तटस्थता, स्वातंत्र्य, स्वयंसेवा, एकता आणि सार्वत्रिकता ही तत्त्वे केवळ शब्द नसून मानवतेच्या सेवेसाठी जगणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या कार्याचे अधिष्ठान आहेत. मानवता हे तत्त्व सर्वांत महत्त्वाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत माणसाचे दुःख कमी करणे आणि त्याचे जीवन सुरक्षित ठेवणे हे रेड क्रॉसचे प्रमुख उद्दिष्ट आहे. निष्पक्षता म्हणजे जात, धर्म, भाषा, वर्ण किंवा राजकीय विचार न पाहता सर्वांना समान मदत करणे. तटस्थतेमुळे रेड क्रॉस कोणत्याही राजकीय किंवा लष्करी संघर्षात पक्षपाती भूमिका घेत नाही. त्यामुळेच जगभरातील लोकांचा या संस्थेवर विश्वास टिकून आहे.

रेड क्रॉसचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या काळातही ही संस्था मोठ्या प्रमाणावर मदतकार्य करते. भूकंप, पूर, चक्रीवादळ, त्सुनामी, दुष्काळ यांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसचे स्वयंसेवक तातडीने घटनास्थळी पोहोचतात. तेथे अन्न, पाणी, औषधे, निवारा आणि मानसिक आधार उपलब्ध करून देतात. अनेक वेळा अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणाही अपुऱ्या पडतात, परंतु रेड क्रॉसचे स्वयंसेवक जीवाची पर्वा न करता मदतकार्य सुरू ठेवतात. त्यामुळे लाखो लोकांचे प्राण वाचतात आणि त्यांना नवजीवन मिळते.

आरोग्य क्षेत्रामध्ये रेड क्रॉसचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. रक्तदान चळवळीमध्ये या संस्थेची भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. जगभरात रक्तदान शिबिरे आयोजित करून लाखो रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य रेड क्रॉस करत आहे. आजही अपघात, शस्त्रक्रिया किंवा विविध आजारांमुळे अनेक रुग्णांना रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तदान हे सर्वांत मोठे दान मानले जाते. रेड क्रॉसने समाजात रक्तदानाविषयी जागृती निर्माण केली आहे. 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश या संस्थेने प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात रेड क्रॉसने दिलेली सेवा संपूर्ण जगाने अनुभवली. त्या कठीण काळात लाखो लोकांना अन्न, औषधे, ऑक्सिजन आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात रेड क्रॉसने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. लोकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण असताना रेड क्रॉसचे स्वयंसेवक धैर्याने काम करत होते. अनेकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवले. महामारीच्या काळात मानवतेचे खरे दर्शन घडवणाऱ्या संस्थांमध्ये रेड क्रॉसचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

भारतात रेड क्रॉस चळवळीची स्थापना १९२० साली झाली. भारतीय रेड क्रॉस सोसायटीने देशभरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि आपत्ती व्यवस्थापनाचे उपक्रम राबवले आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवा पोहोचवणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे, प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देणे आणि आपत्तीग्रस्तांना मदत करणे ही या संस्थेची प्रमुख कामे आहेत. भारतामध्ये पूर, भूकंप, दुष्काळ आणि चक्रीवादळांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसने दिलेली मदत लोकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

महाराष्ट्रातही रेड क्रॉसचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. पूरग्रस्त भागांमध्ये मदतकार्य, आरोग्य शिबिरे, रक्तदान मोहिमा आणि विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून ही संस्था समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत आहे. ग्रामीण भागात प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देऊन अनेकांचे जीव वाचवण्यास मदत होत आहे. आजच्या काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित स्वयंसेवकांची गरज वाढत आहे आणि रेड क्रॉस या क्षेत्रात प्रभावीपणे कार्यरत आहे.

रेड क्रॉसच्या कार्यामध्ये युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. महाविद्यालये आणि शाळांमध्ये युवक रेड क्रॉसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवा, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित केली जाते. युवकांनी समाजासाठी काम करावे, रक्तदान करावे, पर्यावरण संवर्धनात सहभागी व्हावे आणि संकटाच्या काळात लोकांना मदत करावी, हा संदेश युवक रेड क्रॉसद्वारे दिला जातो. आजच्या तरुण पिढीमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी ही चळवळ अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्यामागे केवळ संस्थेच्या कार्याचा गौरव करणे हा उद्देश नाही, तर समाजामध्ये मानवतेची भावना रुजवणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली तरी मानवी संवेदनशीलता अनेक ठिकाणी कमी होताना दिसते. स्वार्थ, स्पर्धा आणि भौतिकवादाच्या या काळात माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्था मानवतेचे महत्त्व अधोरेखित करतात.

मानवतेच्या सेवेसाठी आर्थिक संपत्तीपेक्षा संवेदनशील मनाची अधिक गरज असते. एखाद्या संकटग्रस्त व्यक्तीला आधार देणे, भुकेल्याला अन्न देणे, रक्तदान करणे किंवा आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणे या छोट्या कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवू शकतात. रेड क्रॉस आपल्याला हेच शिकवते की, मानवतेपेक्षा मोठा धर्म कोणताही नाही.

आज जगभरात युद्ध, दहशतवाद, हवामान बदल आणि महामारी यांसारखी अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. लाखो लोक विस्थापित होत आहेत, अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्थांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. मानवतेच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या या संस्था जगात आशेचा किरण निर्माण करतात. तंत्रज्ञानाच्या मदतीने रेड क्रॉसने आपले कार्य अधिक प्रभावी केले आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी आधुनिक साधने, माहिती तंत्रज्ञान आणि संप्रेषण माध्यमांचा वापर करून मदतकार्य अधिक वेगाने केले जात आहे.

रेड क्रॉसचे स्वयंसेवक हे या चळवळीचे खरे शिल्पकार आहेत. कोणतीही अपेक्षा न ठेवता समाजासाठी काम करणारे हे स्वयंसेवक मानवतेची जिवंत उदाहरणे आहेत. अनेक वेळा स्वतःच्या कुटुंबाची चिंता बाजूला ठेवून ते संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जातात. त्यांच्या सेवेमुळेच लाखो लोकांना नवजीवन मिळते. त्यांच्या कार्यामुळे समाजामध्ये सहकार्य, बंधुभाव आणि एकतेची भावना निर्माण होते.

जागतिक रेड क्रॉस दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. समाजात असलेल्या दुःख आणि वेदना कमी करण्यासाठी प्रत्येकाने काही ना काही योगदान दिले पाहिजे. रक्तदान, अवयवदान, स्वयंसेवा, पर्यावरण संवर्धन किंवा शिक्षणाच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करता येऊ शकते. माणसाने केवळ स्वतःपुरता विचार न करता समाजाच्या कल्याणासाठी पुढे आले पाहिजे. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती सुरक्षित आणि सुखी असेल, तरच खऱ्या अर्थाने मानवतेचा विजय होईल.

आज अनेक तरुण सामाजिक कार्याकडे वळताना दिसत आहेत, ही सकारात्मक बाब आहे. समाजमाध्यमांच्या माध्यमातून जनजागृती, निधी संकलन आणि मदतकार्य अधिक प्रभावीपणे केले जात आहे. परंतु केवळ ऑनलाईन सहानुभूती पुरेशी नसून प्रत्यक्ष कृती अधिक महत्त्वाची आहे. रेड क्रॉसची शिकवण आपल्याला कृतीशील मानवता शिकवते. संकटाच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे हीच खरी देशसेवा आणि मानवसेवा आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, जागतिक रेड क्रॉस दिन हा मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. हेन्री ड्युनाँ यांनी सुरू केलेली ही चळवळ आज जगभरातील लाखो लोकांसाठी आशेचा आधार बनली आहे. सेवा, सहानुभूती, बंधुभाव आणि निःस्वार्थ वृत्ती या मूल्यांवर उभी असलेली रेड क्रॉस चळवळ मानवतेचा खरा चेहरा जगासमोर मांडते. आजच्या काळात प्रत्येकाने या चळवळीपासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात मानवतेची भावना जोपासली पाहिजे. कारण शेवटी माणसाला माणसाचीच गरज असते, आणि संकटाच्या काळात पुढे येणारा मदतीचा हातच खऱ्या अर्थाने मानवतेचा लाल ध्वज ठरतो.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल** – bagate.rajendra5@gmail.com

## ...भ्रमात भाजप नाही, तर जनाधार गमावलेली काँग्रेस आहे !!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांचे पत्रक वाचले. 'काँग्रेस विचारधारा आहे' अशा पोकळ गप्पा मारण्यापेक्षा, त्याच विचारधारेला आज घरघर का लागली आहे, याचे आत्मचिंतन त्यांनी केले असते तर बरे झाले असते. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मांडलेले वास्तव हे केवळ भाजपचे मत नाही, तर तो सोलापूरच्या जनतेचा कौल आहे.



१. 'इतिहास' कुरवाळण्यापेक्षा 'वर्तमान' पहा! नरोटे साहेब, १९८४ चा इतिहास सांगून जनतेची दिशाभूल करू नका. तेव्हा भाजपचे २ खासदार होते, पण आज भाजप ३०० पार आहे आणि काँग्रेस सलग दोन वेळा विरोधी पक्षनेते पदासाठीही संघर्ष करत होती, हे विसरू नका. इतिहास सांगणारे लोक तेव्हाच उरतात जेव्हा त्यांच्याकडे वर्तमानात सांगण्यासारखे काही नसते.

२. काँग्रेस ही विचारधारा की घराणेशाही? देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील काँग्रेस आणि आजची 'गांधी-शिंदे' घराण्याची काँग्रेस यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. काँग्रेसमध्ये लोकशाही उरली नसून केवळ घराणेशाही उरली आहे, म्हणूनच निष्ठावान कार्यकर्ते पक्ष सोडून जात आहेत. विचारधारा असती तर उमेदवार पळवण्याची भीती तुम्हाला वाटली नसती.

३. विकासावर बोला, यंत्रणांवर रडू नका! जेव्हा जनता नाकारते, तेव्हा ईव्हीएम आणि सरकारी यंत्रणांवर खापर फोडणे ही काँग्रेसची जुनी खोड आहे. ज्यांनी आयुष्यभर भ्रष्टाचाराचे इमले बांधले, त्यांनाच ईडी आणि सीबीआयची भीती वाटते. पारदर्शक काम करणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांना जनतेचा पाठिंबा आहे, पोलिसांच्या लाठीचा किंवा चौकशीचा धाक नाही.

४. गृहमंत्र्यांच्या 'स्तरा'वर बोलण्यापूर्वी स्वतःचा आरसा पहा! देवेंद्र फडणवीस यांनी राज्याला विकासाची आणि सुरक्षिततेची दृष्टी दिली आहे. महिला सुरक्षेवर राजकारण करणाऱ्या खासदार प्रणितीताईंनी सांगावे की सोलापूरच्या प्रलंबित प्रश्नांवर त्यांनी केंद्रात किती वेळा आवाज उठवला? केवळ 'जनता दरबार' भरवून फोटो काढण्यापेक्षा, सोलापूरच्या विमानतळाचा प्रश्न असो वा पाणी प्रश्न, तो सोडवण्यासाठी भाजप सरकारनेच कंबर कसली आहे.

५. जनतेचा विश्वास कामावर, भाषणांवर नाही! सोलापूरकरांनी महापालिका, जिल्हा परिषद आणि लोकसभा निवडणुकीत वारंवार भाजपला कौल दिला आहे. हा कौल 'साम-दाम-दंड-भेदा'मुळे नाही, तर मोदीजींच्या नेतृत्वाखालील विकासकामामुळे मिळाला आहे. सोलापूरच्या जनतेच्या मनात स्थान निर्माण करण्यासाठी केवळ 'जनवात्सल्य'चे फलक पुरेसे नसतात, तर जमिनीवर काम करावे लागते.

आमचा सल्ला आहे: काँग्रेस संपेल की नाही हे काळच ठरवेल, पण सध्या ज्या गतीने काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते पक्ष सोडत आहेत, त्यावरून काँग्रेसला भविष्य उरले नाही हे स्पष्ट आहे. सत्तेसाठी धडपडण्यापेक्षा आधी आपला उरलासुरला पक्ष वाचवा!

**–प्रदीप पाटील**
**जिल्हा सरचिटणीस**
**भाजपा सोलापूर जिल्हा (पूर्व)**

## भूसंपादन प्रक्रियेतील भ्रष्टाचारावर महसूलमंत्र्यांचा आसूड, एसओपी तयार करण्याचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील भूसंपादन प्रक्रियेत कोणत्याही स्वरूपात गैरव्यवहार खपवून घेतला जाणार नाही. शेतकऱ्यांच्या घामाचा मोबदला हडपणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची आणि भू-माफियांची आता खैर नाही,'' अशा शब्दांत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत प्रशासनाला सज्जड दम भरला.

राज्यात विविध प्रकल्पांसाठी सुरू असलेल्या भूसंपादनामध्ये अधिकारी पैसे मागत असल्याच्या गंभीर तक्रारी प्राप्त होताच, मंत्र्यांनी आज मंत्रालयात तातडीची आढावा बैठक बोलावली होती. या बैठकीत त्यांनी भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कडक पावले उचलण्याचे निर्देश दिले.

मंत्री बावनकुळे यांनी प्रत्यक्ष कारवाईचे आदेश दिले आहेत. विशेषतः प्रकल्प जाहीर होण्यापूर्वी दोन ते तीन वर्षे आधी ज्या जमिनींची खरेदी-विक्री झाली आहे, त्यांची सखोल चौकशी करण्याचे आदेश त्यांनी दिले. ''जमिनीचा मोबदला लाटण्यासाठी संगनमताने व्यवहार करणाऱ्यांवर कडक



कारवाई करा. जास्त भावाने जमिनी खरेदी केल्याचे दाखवून झालेल्या रजिस्ट्रींची चौकशी करून सत्य बाहेर आणा,'' असे निर्देश त्यांनी दिले.

''भू-माफियांना सोडणार नाही,'' असा आक्रमक पवित्रा घेत मंत्र्यांनी ठाण्यातील भूदान जमिनींच्या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. भूदान जमिनी 'वर्ग-१' करून त्या रहिवासी क्षेत्रात कशा वळवण्यात आल्या, याची आता झाडाझडती होणार आहे. जे अधिकारी मोबदला देण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैशांची मागणी करत आहेत, त्यांच्यावर मंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून अशा अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीत आगामी नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भूसंपादन आणि इतर महसुली विषयांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. कुंभमेळ्याच्या कामात कोणतीही दिरंगाई किंवा तांत्रिक अडचण येऊ नये, यासाठी प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीला महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर उपस्थित होते. तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य शासनाने राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीअंतर्गत (एनपीएस) कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी 'सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना' लागू केली आहे. वित्त विभागाने बुधवारी यासंदर्भातील सविस्तर शासन निर्णय जारी केला असून, या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र व इच्छुक कर्मचाऱ्यांनी ३१ डिसेंबर २०२६ पर्यत आपले पर्याय संबंधित कार्यालय किंवा विभाग प्रमुखांकडे सादर करणे आवश्यक आहे.

सुधारित योजनेनुसार, ज्या कर्मचाऱ्यांनी २० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केली आहे, त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के निवृत्तीवेतन आणि त्यावर लागू असणारा महागाई भत्ता (डीए) मिळेल. २० वर्षांपेक्षा कमी व १० वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या आधारे सेवेच्या प्रमाणात निवृत्तीवेतन देय असेल. १० वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्यावर किमान निवृत्तीवेतन ७ हजार ५०० रुपये निश्चित करण्यात आले आहे. तथापि, १० वर्षांपेक्षा कमी सेवा असलेल्या कर्मचाऱ्यांना हे किमान निवृत्तीवेतन लागू असणार नाही.

राजीनामा दिलेल्या कर्मचाऱ्यांसाठी नियम

ज्या कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीअंतर्गत जमा झालेल्या संचित निधीतून रक्कम काढली असेल, त्यांना ती रक्कम १० टक्के व्याजासह जमा करणे बंधनकारक असेल. अन्यथा त्यांच्या निवृत्तीवेतनात त्या प्रमाणात कपात करण्यात येईल. तसेच, ज्या कर्मचाऱ्यांनी राजीनामा दिला आहे, त्यांना या सुधारित योजनेचे लाभ मिळणार नसून, ते केवळ मूळ राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीच्या लाभासाठी पात्र असतील.

कुणकुणाचा समावेश?

या सुधारित योजनेचा लाभ केवळ शासकीय कर्मचाऱ्यांपुरता मर्यादित नसून, त्यात जिल्हा परिषद कर्मचारी, मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, अकृषी विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न अनुदानित अशासकीय महाविद्यालये आणि कृषी विद्यापीठांमधील कर्मचाऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापूर जिल्ह्यात सफाई कर्मचाऱ्यांसाठी मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करणे आवश्यक

## महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले अधिकाऱ्यांना निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : सफाई कर्मचाऱ्यांच्या समाजाच्या मुख्य प्रवाहात आण्याकरिता केंद्र व राज्यशासन मिळून काम करीत आहेत; त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातही सफाई कर्मचाऱ्यांच्या पुर्नवसनाकरिता मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करावे , या मॉडेलची अंमलबजावणी राज्यात करण्यात येईल, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.




जिल्हा नियोजन भवन येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारण करण्याकरिता केलेल्या उपाययोजनांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कुशाल जैन,सहायक आयुक्त समाज कल्याण श्रीमती सुलोचना सोनवणे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी तसेच विविध संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. डागोर म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणाकरिता घरकुल, आरोग्य, शिक्षण, रोजगार आदी विषयांशी निगडित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने भरावयांच्या पदांबाबतची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. नगर विकास विभागाचे २२ ऑक्टोबर २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना लागू करण्यात आली असल्याने या आदेशाच्या दिनांकानंतर सेवानिवृत्त झालेल्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे असे सफाई कामगार आणि २२ ऑक्टोबर २००८ नंतर सेवेत असलेले जे सफाई कामगार मृत्यू झाले आहेत अशा मृत सफाई कामगारांच्या पात्र वारसांना घरे उपलब्ध करुन देण्यात यावी.

केंद्र व राज्यशासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देण्याकरिता शिबीरांचे आयोजन करावे. शिबीरे आयोजित करतांना सफाई कामगार क्षेत्रात कार्यरत अधिकृत संघटनांसोबत सोबत घ्यावे. विविध लोककल्याणकारी योजनांची व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सेवांचा लाभ कॅशलेस सुविधांचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. सफाई कर्मचाऱ्यांशी निगडित प्रलंबित मार्गी लावून तसा अहवाल आयोगाकडे सादर करावा, अशा सूचना श्री. डागोर यांनी दिल्या.

सफाई कर्मचारी आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे जिल्ह्यात काम करण्यात येईल. यापूर्वीच्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे सर्व संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल लवकरात लवकर आयोगाकडे सादर करावा, असेही जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी बैठकीस उपस्थित विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

## रासायनिक खताबरोबरण, शेण खताची दर वाढले ; शेतकऱ्यांना बसणार आर्थिक फटका

**शेतकऱ्यांचा सेंद्रिय शेतीकडे कल...**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अमेरिका इराण यांच्यामध्ये युद्ध सुरू आहे त्यामुळे रासायनिक खताचे दर वाढलेले आहेत. आता शेण खताची दर सुद्धा वाढले असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

रासायनिक खतामुळे जमिनीची सुपीकता कमी होत चालली आहे व शेताचा हक्क कमी होत चाललेला आहे. शेतीची सुपीकता कमी होत चाललेली आहे त्यामुळे शेतकऱ्यांना शेणखताचा वापर करावा लागत आहे पण शेणखताचे दर पाच ते सहा हजार होते आता सात ते आठ हजार रुपये द्यावे लागत आहे. ट्रॉलीचा दर असा आहे. बाजारामध्ये रासायनिक खताचे दर वाढत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचा कल हा शेणखताकडे असल्याचे दिसून येत आहे. माझा आता शेणखताच्या दरात ही वाढ होऊन होत असल्यामुळे शेतकरी आता अडचणीत व त्याला त्या वाढीव दरात मिळत असल्यामुळे शेती करण्यासाठी भाजीपाला फळे यांना परदेशात चांगली मागणी असते त्यामुळे आता शेतकऱ्यांना सेंद्रिय खत मध्ये शेणखताकडे कल असल्यामुळे आता त्याच्या मागणीत वाढ झाली आहे त्यामुळे दरातही वाढ झाली आहे.

## टाकळीवाडी परिसरात पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्याची धडपड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ परिसरात सध्या उन्हाचा तडाका फार असल्यामुळे शेतकरी आपले पीक वाचण्यासाठी रात्रीचा दिवस करत आहे.

बोर, विहीर, नदी, यांना पाणी कमी असल्याने शेतकरी रात्रभर जागून शेतीला पाणी पाजत आहे.

अनेक पिके करपत आहे. शेतकरी हवालदिल झालेला आहे. आपले पीक वाचवण्यासाठी शेतकरी रात्रीचा दिवस करत आहे.

वळवाचा पाऊस पडावा अशी अपेक्षा शेतकरी करत आहे.

पाणी पिकाला कमी मिळत असल्यामुळे एक सरी आड पाणी पाजून पीक वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## भोसे येथील यात्रेत काँग्रेसने उभारली पाणपोई



**जिल्हा उपाध्यक्ष हनुमंत मोरे यांनी भागवली भाविकांची तहान**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/(प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील भोसे येथील श्री जानुबाई देवी यात्रेस उधान आले आहे. रणरणत्या उन्हात भाविकांच्या घशाला कोरड पडत आहे.या भाविकांची तहान भागवण्याचा उपक्रम दरवर्षीप्रमाणे काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष हनुमंत मोरे यांनी पार पाडला आहे. या पाणपोयीचे उद्घाटन उद्घाटन ज्येष्ठ विधीज्ञ तसेच समाजसेवक विश्वनाथ बापू कोरके यांच्या शुभहस्ते गुरुवारी सकाळच्या सुमारास पार पडले.

यावेळी काँग्रेस नेते हनुमंत मोरे, प्रा. महादेव तळेकर, राजकुमार टरले, आप्पासाहेब थिटे आदी मान्यवर उपस्थित होते.

तहानलेल्याला पाणी, भुकेल्याला अन्न, शिक्षणापासून वंचितांना शिक्षण ही संत गाडगेबाबांची शिकवण होती. या शिकवणीचे आचरण काँग्रेस नेते हनुमंत मोरे यांनी केले आहे. पंढरपूर तालुक्यातील भोसे गावात श्री जानुबाई देवीची यात्रा तसेच गायकवाड साहेबांचा उरूस दरवर्षी मोठ्या उत्साहात भरतो. दरवर्षी मे महिन्यात भरणाऱ्या या यात्रेवेळी पारा चांगलाच वाढलेला असतो. यावेळी यात्रेस येणाऱ्या हजारो भाविकांना खरी गरज असते ती , पिण्याच्या पाण्याची. ही गरज हनुमंत मोरे यांनी अनेक वर्षापासून ओळखली आहे. दरवर्षीच या यात्रेत भाविकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जाते. या पाण्याचा आस्वाद भाविक आनंदाने घेतात. मुळातच समाजसेवेची आवड असल्याने, हनुमंत मोरे हे हा उपक्रम दरवर्षीच राबवतात. यावर्षीही येथील चांदणी चौक येथे खा. प्रणिती शिंदे यांचे बॅनर लावून , हा उपक्रम त्यांनी समर्थपणे राबवला आहे. गुरुवारी सकाळी या पाणपोयीचे उद्घाटन थाटात करण्यात आले.

याप्रसंगी दिलीप कोरके, नवनाथ कोरके, नवनाथ मेहेर, पिंटू अडगळे, शेखर मोरे, अशोक अवताडे, तानाजी कोळी, हनुमंत नाईकनवरे, नागनाथ सरडे, नवनाथ कोरके यांच्यासह इतर काँग्रेस प्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## नैताळेच्या गौरव साठे यांचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेमध्ये यश; महसूल सहाय्यक पदावर निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील नैताळे येथील युवक गौरव राजेंद्र साठे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एम.पी.एस.सी) परीक्षेत यश संपादन करत महसूल सहाय्यक पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे नैताळे व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

गौरव साठे यांचे प्राथमिक शिक्षण इयत्ता १ ली ते ४ थीपर्यंत जिल्हा परिषद शाळा नैताळे येथे झाले. त्यानंतर इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण वैनतेय विद्यालय, निफाड येथे पूर्ण केले. पुढे ११ वी ते पदवीपर्यंतचे शिक्षण नाशिक येथील केटीएचएम महाविद्यालयात त्यांनी पूर्ण केले. त्यांनी वाणिज्य शाखेतून पदवी संपादन केली.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी चार वर्षे खाजगी कंपनीत नोकरी केली. मात्र, शासकीय सेवेत जाण्याची जिद्द मनाशी बाळगून त्यांनी नोकरीचा राजीनामा देत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेची तयारी सुरू केली. या कठीण प्रवासात त्यांना कुटुंबीयांचे तसेच मित्रपरिवाराचे मोलाचे सहकार्य लाभले. सातत्यपूर्ण परिश्रम, प्रबळ इच्छाशक्ती आणि ध्येयवेड्या वृत्तीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले.गौरव साठे यांनी आपल्या यशाचे श्रेय आई मिनाताई साठे, वडील राजेंद्र साठे, आजी इंदुबाई साठे, आजोबा गंगाधर साठे तसेच लहान भाऊ बंटी साठे आणि मित्रपरिवाराला दिले आहे. पहिलीपासून पदवीपर्यंत मी एक सामान्य विद्यार्थी होतो; मात्र कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि स्वतःची मेहनत यामुळेच हा टप्पा गाठता आला, असे त्यांनी सांगितले.

### ॲड. प्रकाश आंबेडकरांची मागणी

## तमिळनाडूत सर्वात मोठा पक्ष म्हणून टीव्हीकेलाच सरकार स्थापनेचे निमंत्रण द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : तमिळनाडूमध्ये सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आलेल्या ढतघ पक्षाला सरकार स्थापनेसाठी निमंत्रण देऊन विजय यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ देण्याची संधी राज्यपालांनी द्यावी, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मांडली आहे. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर ट्विट करून आपली भूमिका स्पष्ट केली.

राज्यपाल विजय यांना ढतघ कडे बहुमताचा आकडा नसल्याचा संशय या कारणावरून सरकार स्थापनेसाठी बोलावण्यास नकार देऊ शकत नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद १६४ (२) नुसार विजय आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला विधानसभेत बहुमत सिद्ध करावे लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यासाठी त्यांनी यापूर्वीच्या दोन घटनांचा संदर्भ दिला आहे. १९८९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेस (ख) हा १९४ जागांसह सर्वात मोठा पक्ष होता. तत्कालीन राष्ट्रपती रामास्वामी वेंकटरमण यांनी प्रथम काँग्रेसला सरकार स्थापनेसाठी आमंत्रित केले होते. मात्र राजीव गांधी यांनी सरकार स्थापन करण्यास नकार दिल्यानंतर नॅशनल फ्रंटचे नेते व्ही. पी. सिंह यांना सरकार स्थापनेसाठी निमंत्रित करण्यात आले आणि २ डिसेंबर १९८९ रोजी त्यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती.

तसेच १९९६ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला होता. मात्र बहुमतासाठी आवश्यक आकडा नसल्याने त्रिशंकू लोकसभा निर्माण झाली होती. तत्कालीन राष्ट्रपती शंकर दयाल शर्मा यांनी अटल बिहारी वाजपेयी यांना सरकार स्थापनेसाठी आमंत्रित केले होते आणि त्यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. मात्र लोकसभेत बहुमत सिद्ध करण्यात अपयश आल्याने २८ मे १९९६ रोजी अविश्वास प्रस्तावादरम्यान १३ दिवसांतच त्यांना राजीनामा द्यावा लागला होता.

याच पार्श्वभूमीवर, सर्वात मोठा पक्ष म्हणून ढतघ ला सरकार स्थापनेसाठी आणि विजय यांना तमिळनाडूचे पुढील मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारण्यासाठी राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांनी विधिवत निमंत्रित करावे, अशी मागणी प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. तसेच त्यांना विधानसभेच्या पटलावर बहुमत सिद्ध करावे लागेल, असेही त्यांनी नमूद केले.

## स्वेरी फार्मसी आणि आयसीटी, मुंबई यांच्यात सामंजस्य करार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात जागतिक स्तरावर नाव असलेल्या मुंबई येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी' (आयसीटी) आणि गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी यांच्यामध्ये नुकताच सामंजस्य करार (एमओयु) संपन्न झाला. या सामंजस्य करारामुळे ग्रामीण भागातील औषधनिर्माणशास्त्राच्या विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना नविन संशोधनास वाव मिळणार आहे.

या सामंजस्य कराराचा मुख्य उद्देश हा संशोधन आणि विद्यार्थी विकासावर भर देणे हा असून औषधनिर्माणशास्त्रातील नाविन्यपूर्ण संशोधन, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि प्राध्यापकांसाठी उच्चस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे हा आहे. या संयुक्त भागीदारीमुळे दोन्ही संस्थांमधील संशोधक एकत्र येऊन नवीन औषध प्रणाली आणि आरोग्य क्षेत्रातील विविध आव्हानांवर काम करू शकणार आहेत. मान्यवरांच्या उपस्थितीत या महत्वपूर्ण कराराच्या कागदपत्रावर आयसीटी मुंबईचे कुलगुरू डॉ. अनिरुद्ध पंडित आणि स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डॉ. पी. के. खुळे आणि डॉ. व्ही. व्ही. मोरे यांनी स्वाक्षरी केल्या. या करारामुळे आयसीटीमधील प्रगत प्रयोगशाळा आणि तंत्रज्ञान स्वेरीच्या विद्यार्थ्यांसाठी खुले होईल.' कराराचे मुख्य फायदे म्हणजे संशोधन उपक्रमात औषधनिर्माण क्षेत्रातील प्रगत संशोधनासाठी दोन्ही संस्था संयुक्तपणे काम करतील. विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, गेस्ट लेक्चर्स आणि प्रयोगशाळेतील प्रत्यक्ष कार्याचा अनुभव घेता येईल. या करारानुसार प्राध्यापकांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित केल्या जातील, ज्यामुळे अध्यापन आणि संशोधन पद्धतींमध्ये अधिक सुधारणा होईल. स्वेरीचे सचिव डॉ. सूरज रोंगे यांनी या कराराबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, 'आयसीटी सारख्या नामांकित संस्थेशी जोडले जाणे ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. याचा सर्वाधिक फायदा आमच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये आणि उच्च शिक्षणात होईल.' या करारामुळे पंढरपूरसारख्या ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत होणार असून, औषधनिर्माण क्षेत्रातील संशोधनाला नवीन दिशा मिळणार आहे. या सामंजस्य कराराचे हस्तांतरण आयसीटी मुंबईचे प्राध्यापक डॉ. श्रीरंग जोशी यांनी केले असून, यावेळी प्रा. डॉ. शिरीषकुमार आंबवडे हे उपस्थित होते. या यशस्वी कराराबद्धल संस्थेचे संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी या सामंजस्य कराराचे स्वागत केले आहे.

# देऊळगाव राजा वनपरीक्षेत्रा अंतर्गत जवळखेड, बोरखेडी बावरा, काळापानी नर्सरी, खामगाव खापरखूटी ठिकाणचे क्षेत्र आगीत खाक

## मात्र आग लावली कीं लागली या बाबत शंका - मुख्यवन संरक्षक प्रा अमरावती यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते बबन सरकटे यांची लेखी तक्रार दाखल, चौकशीची मागणी







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा

जिल्हा प्रतिनिधी : देऊळगाव राजा : वनपरीक्षेत्र अधिकारी प्रा देऊळगाव राजा अंतर्गत देऊळगाव राजा व सिंदखेड राजा या दोन्ही ही तालुक्यातील जवळखेड अस-ोला फाटा २५ हेक्टर प्लांटेशन व नियत क्षेत्र बोरखेडी बावरा १०+१५ एकूण २५ व सिंदखेड राजा वर्तुळ मधील काळापानी नर्सरी व बालउद्यान १० हेक्टर व खामगाव खापरखूटी मधील ८० हेक्टर अंदाजे केवळ अधिकारी यांच्या निष्काळजी पणा मुळेच जळून खाक झाली आहेत. या घटनेमुळे आग नैसर्गिक होती की जाणूनबुजून लावण्यात आली, याबाबत संशय गडद झाला आहे. लाखो रुपयांचा शासन निधी खर्चुन उभारलेला प्रकल्प पूर्णतः नष्ट झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्राप्त माहितीनुसार, २५, व १०+१५ व ८० हेक्टर क्षेत्रात रोपांची लागवड करण्यात आली होती. मात्र घटनास्थळी एकही रोप शिल्लक नसल्याचे दिसून आले. त्यामुळे 'रोपे खरोखर होती का?' की कागदोपत्रीच दाखवण्यात आली होती, असा थेट सवाल उपस्थित होत आहे. या वनक्षेत्राला यापूर्वीही आग लागल्याच्या घटना घडल्याआहेत. मात्र प्रत्येक वेळी वरिष्ठांकडून ठोस कारवाई न झाल्याने निष्काळजीपणा की संगनमत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नियमाप्रमाणे मार्चपूर्वी जाळरेषा (फायर लाईन) करणे आवश्यक असताना ती न केल्याचा आर-ोपआहे. कागदोपत्री काम पूर्ण दाखवून बोगस व्हाऊचर्स सादर केल्याने भ्रष्टाचार लपवण्यासाठीच आग लावली असावी, अशी दाट शंका व्यक्त केली जात आहे. आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी तांत्रिक व स्वतंत्र चौकशीची मागणी होत आहे. ड्रोन सर्वे, सॅटेलाइट इमेजेसव फॉरेन्सिक तपासाद्वारे सत्य बाहेर आणावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. २०२३ पासून या प्रकल्पाची देखभाल कोण करत होते? संबंधित अधिकारी, रेंज अधिकारी, बीट गार्ड व मजूर यांची भूमिका काय होती? अधिकारी मुख्यालयी असूनही इतकी मोठी आग कशी लक्षात आली नाही, असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.

**पर्यावरणाला मोठा फटका**

या आगीत केवळ रोपेच नव्हे तर लहान प्राणी, पक्षी, वन्यजीव आणि जैवविविधतेचेही मोठे नुकसान झाले आहे. भविष्यातील हरित पट्टा उद्ध्वस्त झाल्याची खंत व्यक्त होत आहे. या प्रकरणी अम रावती सीसीएफ यांच्याकडे लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते बबन सरकटे यांनी केली असून, वनमंत्री, मंत्रालय मुंबई, तसेच नागपूर येथील वनप्रमुख कार्यालयालाही माहिती देण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे तात्काळ निलंबन करावे, निधीच्या खर्चाची ऑडिट तपासणी करावी दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येत आहे. जर लाखो रुपये खर्च करूनही प्लांटेशन जळत असेल, तर अधिकारी केवळ पगारापुरतेच मर्यादित आहेत का? जबाबदारी कोण घेणार? या संपूर्ण प्रकरणामुळे सिंदखेडराजा व देऊळगाव राजा तालुक्यात खळबळ उडाली असून, आता प्रशासन कोणती ठोस कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बाराभाटी रेल्वे स्टेशनवर तिकीट विक्री सुरू करा




## प्रवाशांची मागणी; ७-८ महिन्यापासून आहे बंद

मुन्नाभाई नंदागवळी/बाराभाटी : स्थानिक ठिकाण बाराभाटी येथील रेल्वे स्टेशन हे खूप वर्षापासून सुरू आहे. पण गेल्या काही महिन्यांपासून सदर रेल्वे स्टेशनवर तिकीट विक्री बंद झालेली आहे. त्यामुळे प्रवाशांना फारच अडचण होत आहे. म्हणून बाराभाटी रेल्वे स्टेशनवर तिकीट विक्री सुरू करा. अशी मागणी परिसरातील प्रवाशांनी केली आहे.

या रेल्वे स्टेशनवर आधी तिकीट विक्री सुरू होती. परंतु कोणत्या कारणाने बंद झाली काही समजली नाही. या प्रकारामुळे प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फटका बसतो आहे. अशी तक्रार गोंदिया येथे केली आहे असेही प्रवासी म्हणतात.

अर्जुनीमोरगाव तालुक्यातील अनेक ठिकाणची प्रवासी मंडळी या स्टेशनवरून ये जा करतात. तर त्यांच्याकडे तिकीट नसते तेव्हा भुर्दंड म्हणून १० रुपयाचे तिकिटासाठी ५०० रुपये दयावे लागतात. हे चूकीचे असते असे प्रव-ासी सांगतात. सामान्य नागरिकांना रेल्वेचा प्रवास हा सुकर होतो. कमी पैशाचे भाडे लागते. म्हणून ही सामान्य नागरिकांसाठी सोयीचे होते. हे रेल्वे विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी लक्षात घेऊन बाराभाटी तिकीट विक्री सुरू करावी अशी मागणी नागरिक करत आहेत.

**बाराभाटी लग्नाला गेलो होतो. मग परत येण्यासाठी रेल्वे स्टेशनवर आलो तर तिकीट बंद झाली म्हणून सांगितले. त्यामुळे ही समस्या निर्माण झाली आहे. तात्काळ तिकीट विक्री सुरू केली पाहिजे.**

**- बळीराम लाडे, प्रवासी, सालई/बोळदे**

## दैनंदिन प्रवासी झाले त्रस्त

**७-८ महिण्यापासून तिकीट विक्री बंद असल्याने दररोज जाणारे प्रवासी हे त्रासले आ-हेत. यामध्ये विद्यार्थी, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी, मजूरवर्ग, व्यावसायिक तसेच लग्नसराईला जाणारा प्रवासी हे विना तिकीट प्रवास करताना त्यांची फारच कोंडी होत आहे.**





## प्रविण पट्टेबहादूर यांना महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार : पालकमंत्री दत्ता मामा भरणे यांच्या हस्ते सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिम प्रतिनिधी : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार वितरण सोहळा दिनांक १ मे २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

या सोहळ्यात वाशिम तालुक्यातील केकतउमरा येथील सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेले प्रविण कडूजी पट्टेबहादूर यांना सन २०२५-२६ चा जिल्हा युवा पुरस्कार (युवक गट) प्रदान करण्यात आला. राज्याचे क्रीडा व शालेय शिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दत्ता मामा भरणे यांच्या हस्ते हा सन्मान देण्यात आला.

या प्रसंगी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जित सिंग चव्हाण, जिल्हा पोलीस अधी-क्षक अजून तारे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रविण पट्टेबहादूर यांनी पर्यावरण संवर्धन, स्वच्छता अभियान, आरोग्य जनजागृती, युवकांसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन, ग्रामीण युवकांना संघटित करून योग्य दिशा देणे, महिला सक्षमीकरणासाठी ब्युटी पार्लर व शिवणकला प्रशिक्षण, महिला बचत गटांना प्रोत्साहन, राष्ट्रीय एकात्मता, व्यसनमुक्ती अभियान, गलिच्छ वस्ती सुधारणा, मतदान जनजागृती, डिजिटल साक्षरता व प्रौढ शिक्षण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, तालुका क्रीडा अधिकारी मंगला शेंडे, क्रीडा अधिकारी मारोती सोनकांबळे, वरिष्ठ लिपिक विजय बोथडे, कनिष्ठ लिपिक प्रकाश मोरे, राज्य क्रीडा मार्गदर्शक पूजा भटकर, अक्षय टेंभुर्णीकर, तसेच संतोष फुफाटे, सुशांत कलढोणे, भारत वैद्य, विकास तिडके, कलीम मिर्झा आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले

# रामनगरमधील खचलेल्या गटाराचे काम अखेर सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(प्रतिनिधी); पश्चिमेकडील रामनगर(अ) शंकर मंदिराशेजारील पाण्याच्या टाकीमागील मुख्य गटार खचल्याने याठिकाणी धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती.त्यानंतर तत्काळ स्थानिक सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी याबाबत मनपा एन विभाग सहाय्यक आयुक्त तसेच प्रभाग समिती अध्यक्षा-एन विभाग यांना पत्र लिहून पावसाळ्यापूर्वी या खचलेल्या गटाराच्या कामाला सुरुवात करण्याची विनंती केली होती.त्यानंतर मनपा एन विभाग प्रभाग समिती अध्यक्षा अश्विनी मते यांनी केतन भोज यांच्या पत्राची तत्काळ दखल घेत,संबंधित मनपा एन विभाग प्रशासनाला लगेचच या खचलेल्या गटाराच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या.



अखेर तातडीने मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त निधीतून तसेच मनपा एन विभाग प्रभाग समिती अध्यक्षा अश्विनी मते यांच्या पुढाकाराने व प्रयत्नाने या मुख्य नाल्याच्या दुरुस्तीच्या बांधकाम ाला सुरुवात करण्यात आली आहे.तसेच याबाबत सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांच्यासोबतच या कामाचा पाठपुरावा प्रशांत मुके व ड.करण इंगवले हे देखील करत होते.

## मनपा एन विभाग प्रभाग समिती अध्यक्षा अश्विनी मते यांच्या प्रयत्नाने कामाला सुरुवात

तरी स्थानिक नागरिकांनी तसेच व्यापारी वर्गाणी या खचलेल्या गटाराच्या दुरुस्तीच्या बांधकामाला सुरुवात झाल्यामुळे समाधान व्यक्त केले आहे.

**संकल्प : भारत मातेचे अनिष्ट दूर होऊन. सुख शांती नांदावी**

# निफाडला १० मे पासून होणाऱ्या नाथ संमेलनाची जोरदार तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर आणि श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने वैनतेय विद्यालय निफाड येथे दिनांक दहा व अकरा मे रोजी नाथ संमेलन होणार आहे या निमित्ताने हॉटेल रुद्राय येथे पत्रकार परिषद घेण्यात आली या नाथसंमेलनाचे स्वागत अध्यक्ष वि.दा. व्यवहारे हे असणार आहे या प्रसंगी सम न्वयक मिलिंद चवंडके हे उपस्थित होते,

नाथ संम ेलनात दिनांक दहा मे सकाळी सहा वाजता अभिषेक व नातपंथी होम हवनाने व जल पूजन, वृक्ष पूजन, माती पूजन, व राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे,

सकाळी आठला मंगल वाद्यांसह भव्य शोभायात्रा निघणार असून नवनाथांच्या स्थळांची मृत्तिका का व शक्तिपीठांवरील कुंकवाचे कलश हे आकर्षण ठरणार आहे

सकाळी आकराला ला संकेश्वर येथील श्री जगद्गुरु शंकराचार्य सच्चिदानंद अभिनव विद्या नृसिंह भारती यांच्या हस्ते उद्धाटन होणार आहे, प्रमुख अतिथी म्हणून चंद्रकांत दादा मोरे खासदार भास्कर भगरे उपस्थित राहतील

दिवसभर विविध विषयांवर डॉ. कुशलनाथ मिश्रा, भूषण स्वामी, डॉ.नील-ाताई पाटील व साहित्यिक अनिल बोकील यांची व्याख्याने होणार आहेत सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे

## प.पू. जगदुरु शंकराचार्य सचितानंद अभिनव विद्या नृसिंह भारती,प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, चंद्रकांत दादा मोरे, खासदार भास्कर भगरे, आमदार दिलीप बनकर उपस्थित राहणार

दिनांक अकरा मे ला मिलिंद चवंडके, ब्रह्मानंद स्वामी, शिव रूपानंद स्वामीजी, टी एन परदेशी ,व श्रीपाद कुलकर्णी यांची व्याख्याने होणार आहे



दुपारी सामुदायिक नवनाथ पारायणात सुमारे एकवीस हजार भाविक सहभागी होणार असून संमेलनाचा समारोप परम पूज्य गुरु माऊली अण्णासाहेब मोरे यांचे उपस्थितीत होणार आहे याप्रसंगी दिलीप बनकर यांची प्रमुख अतिथी म्हणून उप-स्थिती राहणार आहे , बाहेर गावाहून आलेल्या सर्व भाविक भक्तांची राहण्याची व जेवणाची सुविधा करण्यात आली आहे तरी

याप्रसंगी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्याध्यक्ष संदीप सुराणा, कार्यवाहक ॲड जगदीश बागडे ,सुभाष खाटेकर केले आहे

जि. प. चे माजी अध्यक्ष पंढरीनाथ थोरे कैलास शेठ सोनवणे व सेवेकरी या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्नशील आहेत

# खामसवाडी येथे ८ मे रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी : रोटरी सेवा ट्रस्ट संचलित, रोटरी नेत्र रुग्णालय (धर्मादाय), धाराशिव यांच्या नेत्र सेवा केंद्र, कळंब यांच्या वती-ने परिसरातील गरजू व सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर शुक्रवार, दि.८ मे २०२६ रोजी सकाळी ८:०० ते ११:०० या वेळेत खामसवाडी, ता. कळंब येथे होणार आहे. या शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून संपूर्ण नेत्र तपासणी, मोतीबिंदू निदान, डोळ्यांच्या इतर आजारांची तपासणी व योग्य म ार्गदर्शन मोफत केले जाणार आहे. ग्रामीण भागा-तील नागरिकांना वेळेवर उपचार मिळावेत व अंधत्व टाळता यावे हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. तरी परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरपंच अम ोल पाटील यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९३७२८३७६८६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे.